Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawani
Behind Agharkar Research Institute, Bhamburda,
Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
स.नं.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी शेजारी,
आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर,
पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD : (020) 25651751 Secretary (P) : 25651750 | EPABX 25705000 |
Email : secretary.stateboard@gmail.com

महत्वाचे / तातडीचे

क्रमांक रा.मं./परीक्षा-८/४९६३
पुणे - ४११ ००४
दिनांक -३०/०९/२०१९

प्रति,
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

विषय :- माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय यांचे प्रोफाईल भरण्यास मुदतवाढ देण्याबाबत.

संदर्भ -१. या कार्यालयाचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा-८/४१९९ दि.१६.८.२०१९
२. या कार्यालयाचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा-८/४२९९ दि.२०.८.२०१९

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास अनुसरुन कळविण्यात येते की, शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांकडून वेळोवेळी अद्ययावत माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी प्रोफाईल भरण्याबाबत दिनांक ०१ सप्टेंबर, २०१९ ते ३० सप्टेंबर २०१९ हा कालावधी देण्यात आलेला होता.

तथापि, काही माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांची प्रोफाइल भरण्याबाबतची प्रक्रीया अद्याप पूर्ण झालेली नाही. सबब, प्रोफाईल भरण्यासाठी मुदतवाढ देण्यात येत असून सदरचा वाढीव कालावधी दि.०१/१०/२०१९ ते दि.३०/१०/२०१९ पर्यंत राहील. याबाबत आपल्या विभागीय मंडळ स्तरावरुन सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना सूचित करण्यात यावे.

तरी, सदर वाढीव कालावधीत प्रोफाईल भरण्याबाबतचे कामकाज पूर्ण करुन घ्यावे. विभागीय मंडळांनी याबाबत गांभीर्याने पाठपुरावा करावा. यानंतर मुदतवाढ देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्यमंडळ कार्यालयास सादर करण्यात यावा.

सचिव,
राज्य मंडळ,पुणे-०४

प्रति,
मुख्याध्यापक व प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त शाळा व क.म.
पुणे, अहमदनगर, सोलापूर

क्रमांक पुविमं/डीपी/
पुणे ४११००५ दिनांक ०१/१०/२०१९

उपरोक्त राज्य मंडळाच्या पत्राची नोंद घेवून , वाढलेल्या मुदतीपूर्वी शाळेची व कनिष्ठ महाविदयालयची प्रोफाईल तयार करून या कार्यालयात ऑन लाईन व हार्डकॉपी तात्काळ सादर करावी.

विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ, पुणे ०५